देशदूत
www.deshdoot.com
/deshdoot /deshdoot /deshdoot Daily Newsgram
नाशिक । बुधवार, दि. ३० जुलै २०२५



# राठोड यांना प्रकाशयोजनेचे प्रथम पारितोषिक

**नाशिक ।** मुंबई येथील रविकिरण मंडळाच्या राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेत नाशिक येथील प्रकाश योजनाकार विनोद राठोड यांना न्यूटनचा लायन या बालनाट्याकरता प्रकाशयोजनेचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

राज्यस्तरीय स्पर्धेत एकूण वीस बालनाट्यांनी सहभाग घेतला. गुरुकुल द डे स्कूलनिर्मित डॉ. राजू गीते लिखित व वृषाक कवठेकर दिग्दर्शित न्यूटनचा लायन या बालनाट्यांकरता विनोद राठोड यांना प्रसिद्ध अभिनेते प्रमोद पवार ह्यांच्या हस्ते प्रकाश योजनेचे प्रथम पारितोषिक देण्यात आले. न्यूटनचा लायन ह्या बालनाट्याला सांघिक प्रथम क्रमांकासहित दिग्दर्शक, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत, अभिनय सर्व विभागात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

याच स्पर्धेत विनोद राठोड यांनी प्रकाशयोजना केलेले बकासुरचा अंत या अमेय गोरे लिखित-दिग्दर्शित पुणे येथील बालनाट्यालाही सांघिक पारितोषिकासह लेखन, दिग्दर्शक अभिनयाचे पारितोषिक मिळाले.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून अभिनेत्री सीमा देशमुख, दिग्दर्शक डॉ.अनिल बांदिवडेकर, विवेक देशपांडे यांनी काम पाहिले.

## आजचे कार्यक्रम

* लेखक रवीकुमार यांच्या भारतीय जीवनशैली पुस्तकाचा प्रकाशन सोहळा.
स्थळ : राजमाता जिजाऊ क्रीडा संकुल, परशुराम तारवालानगर वेळ: सायंकाळी ६.३० वाजता

* मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशनचा द्वितीय वर्धापन दिन.
स्थळ : इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स सभागृह, उंटवाडी वेळ : सायंकाळी ५.३० वाजता

## रासबिहारीत संरक्षण दिन

**नाशिक ।** रासबिहारी आंतरराष्ट्रीय शाळेत निसर्ग संरक्षण दिन साजरा झाला. रासबिहारी आंतरराष्ट्रीय शाळेच्या इको क्लबसह सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारात आयोजित केलेल्या वृक्षारोपण मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला.

## भारतीय लेकींचा बुद्धिबळात दबदबा

**(पान १ वरून)** लागले. प्रोत्साहन द्यावे लागले, असे त्या सांगतात. नेमके इथेच बहुसंख्य मुलांची अडचण होत असावी. कारण खेळून काय होणार आहे? असा प्रश्न बहुसंख्य पालकांना पडतो. तो मुलांना, विशेषतः मुलींना अनेकदा विचारलाही जातो. तथापी मुले आणि त्यांच्या पालकांनी मिळून एकच स्वप्न पाहिले तर ते वास्तवात उतरू शकते हेच दिव्यासारख्या मुलींच्या विजयातून स्पष्ट होते. अर्थात, खेळ महागडे असतात. जागतिक दर्जाचे खेळाडू घडवण्यासाठी आर्थिक बाजू तितकीच महत्वाची असते. त्याला सरकारची साथ अपरिहार्य असते हे खरेच, पण मनात बीजारोपण ही त्याची पहिली पायरी आहे. सगळेच खेळाडू जागतिक दर्जा गाठत नाहीत, पण खेळामुळे होणारे मूल्यसंस्कार आणि विकसित होणारे व्यक्तिमत्व नजरेआड करण्यासारखे नसते. दिव्यासह सर्व विजेत्यांचे अभिनंदन!

# काँग्रेसच्या स्वार्थामुळे सैन्यदलाचे मनोधैर्य खच्ची : मोदी

**(पान १ वरून)** १० मे रोजी भारताने 'ऑपरेशन सिंदूर' स्थगित करण्याची घोषणा केली. पण इथल्या काही लोकांनी सैन्यावर विश्वास न दाखवता अफवा पसरवण्यावर भर दिला.

२ मेच्या मध्यरात्री आणि १० मेच्या पहाटे, भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या अनेक तळांवर हल्ले केले. भारतीय सैन्याने असा हल्ला केला की पाकिस्तानने त्याचा विचारही केला नव्हता. त्यामुळे पाकिस्तान गुडघ्यावर आले. त्यावेळी पाकिस्तानचा पहिला फोन आला. डीजीएमओला पाकिस्तानकडून फोन आला आणि भारताला हल्ले थांबवण्याची विनंती केली,असेही मोदी यांनी सांगितले. ट्रम्प यांच्या मध्यस्थीबाबत मोदी म्हणाले की,आमचा हल्ला निश्चित होता, आमचे ध्येय निश्चित होते. भारताने ते लक्ष्य पूर्ण केले. त्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' स्थगित केले. जगातल्या कोणत्याही नेत्याने हा हल्ला थांबवण्यासाठी विनंती केली नाही हे मी जबाबदारीने सांगतोय.

# सात क्लस्टर प्रकल्प मार्गी

**(पान १ वरून)** आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह यांनी नुकतेच नाशिक भेटीत स्पष्ट केले की, क्लस्टर उभारणीसाठी शासनाकडून ५० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. त्यामुळे शासन या योजनांबाबत प्रोत्साहनात्मक भूमिका घेत आहे.मालेगावच्या स्वीट व स्पोंजी बेकर्स क्लस्टर प्रकल्पांचा सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर झाला असून, निविदा प्रक्रिया सुरु आहे. निविदा पूर्ण झाल्यानंतर निधी वितरित केला जाईल. ओझरचे फूड टेस्टिंग क्लस्टर आणि माळेगावचे फूड पॅकेजिंग, मार्केटिंग क्लस्टर या दोन्ही प्रकल्पांना २० टक्के निधी वितरित झाला असून, उर्वरित निधी देऊन लवकरच प्रत्यक्ष काम सुरू होणार आहे. चांदवड, येवला आणि निफाडच्या क्लस्टरचे प्रस्ताव गेल्या अनेक काळापासून प्रक्रियेत असून, अद्याप त्याचे डीपीआर स्तरावर असून,त्यांना कोणतीच मान्यता मिळालेली नाही.

### दृष्टीपथावरील प्रकल्प

१. बांबू क्लस्टर, प्रतापगड (सुरगाणा) (किंमत ६९.८६ लाख)
२. विश्वकर्मा अभियांत्रिकी क्लस्टर, वणी (दिंडोरी) (किंमत ३ कोटी ३२ लाख)
३. फूड टेस्टिंग क्लस्टर, ओझर (किंमत ११.६८ कोटी)
४. फूड पॅकेजिंग,मार्केटिंग क्लस्टर, माळेगाव (सिन्नर) (किंमत ९.६३ कोटी)
* पैठणी क्लस्टर, येवला (किंमत १२.२३ कोटी)
* स्वीट व स्पोंजी बेकर्स क्लस्टर, मालेगाव (किंमत ११.०६ कोटी)

### प्रस्तावित क्लस्टर

१. भेळभत्ता क्लस्टर, चांदवड
२. उपरणे क्लस्टर, येवला
३. रेझिंग क्लस्टर, निफाड

### औद्योगिक बळकटीसाठी 'क्लस्टर' योजना महत्त्वपूर्ण

शासनाच्या 'क्लस्टर' विकास योजना म्हणजे उद्योगांना सामायिक सुविधा, संशोधन-प्रशिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान, गुणवत्ता चाचणी व बाजारपेठेतील प्रवेश यांसारख्या बाबींसाठी एकत्रित व्यासपीठ उपलब्ध होत आहे. नाशिक जिल्ह्यातील विविध क्षेत्रांना या 'क्लस्टर' प्रकल्पांमुळे मोठा आधार मिळणार आहे.

## ही अखेरची संधी

**(पान १ वरून)** अधिवेशानाचे सूप वाजल्यानंतरची काल पहिलीच मंत्रिमंडळ बैठक होती. पावसाळी अधिवेशनात सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे तसेच गृह राज्यमंत्री योगेश कदम वादग्रस्त ठरले. चित्रफितींमुळे बदनाम झालेल्या शिरसाट आणि कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधी पक्षाने लावून धरली होती. त्याचे पडसाद आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत उमटले. राज्य मंत्रिमंडळाच्या अजेंड्यावरील विषय संपल्यानंतर मुख्य सचिवांसह सर्व अधिकाऱ्यांना बैठकीतून बाहेर काढण्यात आले. अधिकारी बाहेर गेल्यानंतर थेट विषयाला हात घालण्यात आला. सुरुवातीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी मंत्र्यांच्या वागणुकीबद्दल नाराजी व्यक्त केली. मंत्र्यांनी सार्वजनिक ठिकाणी बोलताना आपली वर्तणूक चांगली ठेवावी. राज्य सरकार चांगले काम करत असून मंत्र्यांच्या विधानाने त्यावर पाणी फेरता कामा नये, याची स्पष्ट जाणीव शिंदे आणि पवार यांनी करून दिली. त्यानंतर फडणवीस यांनी सरकारला अडचणीत आणणाऱ्या मंत्र्यांना कानपिचक्या दिल्या.मंत्र्यांच्या उलटसुलट विधानांचा परिणाम सरकारच्या प्रतिमेवर होतो. त्यामुळे मंत्र्यांनी बोलताना सतर्कता बाळगावी. जनमानसात तीव्र प्रतिक्रिया उमटेल, अशी विधाने टाळावीत. यापुढे जर सरकारला अडचण निर्माण होईल अशी कृती मंत्र्यांकडून झाली तर मला विचार करावा लागेल. यापूर्वी आपण सगळ्यांनीच शपथ घेतली आहे. शपथ घेऊनही तुम्हाला लाज कशी वाटत नाही, अशा शब्दात फडणवीस यांनी आपला संताप व्यक्त केला.

# पोलिसांकडून बदनामीचे षड्यंत्र : एकनाथ खडसे

**(पान १ वरून)** पत्रकार परिषदेत त्यांनी स्पष्ट केले. याबाबत वकिलांशी चर्चा झाली असल्याचेही ते म्हणाले. दरम्यान, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी खडसेंचे सर्व आरोप फेटाळून लावत, कारवाई पारदर्शक आणि नियमानुसार झाल्याचे स्पष्ट केले आहे. खडसे म्हणाले, जर चुकीचे असेल तर कारवाई झाली पाहिजे. सरकार आणि पोलिसांनी यावर बोलले पाहिजे. पोलिसांना रेव्ह पार्टीची नेमकी व्याख्या विचारली. तिथे कुठलेही संगीत नव्हते, आदळआपट नव्हती. याला रेव्ह पार्टी म्हणायचे तर प्रत्येक घरात रेव्ह पार्टी होईल,असे ते म्हणाले. पोलिसांनी केवळ बदनामी करण्यासाठी ही रेड टाकल्याचा आरोप त्यांनी केला. खडसे कुटुंबाची, रेव्ह पार्टीच्या नावाखाली बदनामी करण्याचा हा डाव असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अलीकडे सरकारविरोधात रोहिणी खडसे बोलत असल्याने त्यांना बदनाम केले जात असल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला. त्यांचे जावई प्रांजल खेवलकर यांना अडकवण्याचा कट होता आणि त्यांच्यावर पाळत ठेवली जात होती असा दावा खडसे यांनी केला. सिव्हिल ड्रेसमधील पोलीस पाळत ठेवत होते आणि वेस्टिन हॉटेलमध्येही हेच पोलीस आले होते, असे त्यांचे जावई प्रांजल यांनी सांगितल्याचे खडसे म्हणाले.

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा एल्गार

**(पान १ वरून)** २५०० प्रति क्विंटल भाव मिळावा, बाजार हस्तक्षेप योजना लागू करावी आणि निर्यात अनुदान वाढवावे अशा प्रमुख मागण्या केल्या आहेत.

बदलत्या हवामानामुळे चाळीतील कांदा सडत असून, बाजारातही कवडीमोल भावाने विकावा लागत असल्याने शेतकरी दुहेरी संकटात आहेत. या परिस्थितीत शेतकरी संघटनांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले. भिंतीवर कांदे फोडून संताप व्यक्त केला आणि कांदा-भाकरी खाऊन प्रतीकात्मक निषेध केला. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.निवेदनावर प्रवीण अहिरे, विठ्ठल महाजन, बाळासाहेब चौधरी, किरण पाटील, केशव सूर्यवंशी, माणिक निकुंभ, देविदास अहिरे, भास्कर बागुल, पोपट अहिरे, बाळासाहेब धुमाळ, भानुदास ढिकले, शंकर ढिकले, वसंत गवळी, बाळासाहेब शेवाळे, दीपक पगार, विशाल पवार, जगदीश पाटील, युवराज देवरे आदी शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## स्थानिक भाव

| सोने (प्रति १० ग्रॅम) | |
|---|---|
| २४ कॅरेट | ९८,५०० |
| २२ कॅरेट | ९०,६२० |
| चांदी (प्रति किलो) | |
| ११,४००० | |

## शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८०,६९१ |
| | (-५७२) |
| निफ्टी | २४,६८१ |
| | (-१५६) |

## कालचे कांदा भाव

| | आवक (क्विं.) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|---|
| लासलगाव | १०६४६ | ६०० | १७४० | १३०१ |
| विंचूर | ९५५५ | ५०० | १५०१ | १३०० |
| निफाड | ४३०५ | ५०० | १४१० | १३०० |
| सायखेडा | ३७५० | ७५१ | १३३१ | १२०० |
| पिंपळगाव | १२५०० | ७५० | १८७१ | १३२५ |

निकाल
महाराष्ट्र राज्य लॉटरी
## महाराष्ट्र गजराज मासिक सोडत
तिकीट किं. रु. 20/- • सोडत क्रमांक 07 • सोडत दिनांक 29/07/2025

पहिले बक्षिस रु. 5 लाख — GJ-00 : 9197

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

दुसरे बक्षिस रु. 5,000/- — 1905
● चिराग एन्टरप्रायझेस - नाशिक ● मातोश्री एन्टरप्रायझेस - खामगाव ● किशोर लॉटरी सेंटर, सांगली ● श्री एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई ● श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई (2 बक्षिसे)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0857 | 1218 | 1923 | 2587 | 3591 | 3641 | 4695 | 4831 | 7961 | 8672 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2358 | 2866 | 4720 | 4767 | 4889 | 5904 | 7451 | 7706 | 8048 | 9067 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0853 | 3694 | 3730 | 4283 | 4712 | 4878 | 5022 | 9278 | 9392 | 9486 |

सहावे बक्षिस रु. — सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 100/- | | 1432 | 2277 | 3103 | 3857 | 4462 | 5715 | 6615 | 7737 | 8745 | 9139 |
| 0000 | 0816 | 1460 | 2299 | 3120 | 3886 | 4494 | 5764 | 6665 | 7768 | 8780 | 9176 |
| 0004 | 0864 | 1475 | 2413 | 3131 | 3963 | 4522 | 5781 | 6688 | 7785 | 8787 | 9229 |
| 0006 | 0905 | 1528 | 2427 | 3135 | 3964 | 4611 | 5842 | 6693 | 7787 | 8802 | 9299 |
| 0009 | 1054 | 1561 | 2442 | 3200 | 4020 | 4723 | 5856 | 6767 | 7823 | 8808 | 9342 |
| 0040 | 1073 | 1610 | 2528 | 3230 | 4025 | 4845 | 5959 | 6768 | 7837 | 8813 | 9519 |
| 0044 | 1096 | 1619 | 2529 | 3259 | 4056 | 4914 | 5972 | 6830 | 7844 | 8814 | 9591 |
| 0057 | 1102 | 1751 | 2674 | 3286 | 4094 | 4942 | 6004 | 6865 | 7856 | 8857 | 9678 |
| 0071 | 1107 | 1768 | 2786 | 3310 | 4174 | 5021 | 6034 | 6976 | 7897 | 8884 | 9741 |
| 0082 | 1110 | 1821 | 2809 | 3315 | 4178 | 5199 | 6063 | 7019 | 7969 | 8891 | 9798 |
| 0098 | 1131 | 1861 | 2822 | 3318 | 4214 | 5247 | 6110 | 7133 | 7970 | 8913 | 9799 |
| 0108 | 1133 | 1975 | 2827 | 3325 | 4234 | 5250 | 6151 | 7157 | 8032 | 8937 | 9813 |
| 0212 | 1136 | 2028 | 2829 | 3346 | 4247 | 5275 | 6188 | 7339 | 8042 | 8953 | 9866 |
| 0384 | 1197 | 2094 | 2835 | 3376 | 4302 | 5305 | 6267 | 7367 | 8088 | 8954 | 9897 |
| 0431 | 1198 | 2096 | 2854 | 3379 | 4317 | 5389 | 6301 | 7374 | 8170 | 9009 | 9909 |
| 0523 | 1216 | 2110 | 2881 | 3396 | 4402 | 5452 | 6330 | 7407 | 8185 | 9022 | 9918 |
| 0641 | 1240 | 2133 | 2952 | 3448 | 4421 | 5526 | 6378 | 7502 | 8276 | 9060 | 9919 |
| 0680 | 1302 | 2210 | 2998 | 3451 | 4424 | 5561 | 6539 | 7621 | 8386 | 9086 | 9959 |
| 0806 | 1314 | 2212 | 3021 | 3651 | 4427 | 5577 | 6542 | 7627 | 8483 | 9088 | 9965 |
| 0810 | 1391 | 2265 | 3043 | 3739 | 4448 | 5590 | 6605 | 7714 | 8718 | 9121 | 9969 |
| 0815 | 1419 | 2267 | 3085 | 3813 | 4452 | 5645 | 6606 | 7733 | 8719 | 9123 | 9971 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# 'नामको'त मेंदूच्या कर्करोगावर यशस्वी मात



**नाशिक ।** मेमॅट या वैद्यक शास्त्रातील नवीन पद्धतीच्या माध्यमातून मेडुलो ब्लास्टॉमा या मेंदूच्या कॅन्सरवर यशस्वी उपचार करत नामको हॉस्पिटलचे कॅन्सर तज्ज्ञ डॉ. मुकूल घरोटे यांनी किशोरवयीन मुलांना जीवनदान दिले. डॉ. घरोटे यांनी अवलंबलेली ही उपचार पद्धती जगभरातील रुग्णांसाठी सुसह्य उपचारांची नवी दिशा देणारी ठरली आहे. हॉस्पिटलमध्ये दाखल दोन्ही रुग्णांवर आरोग्यदायी योजना, विविध संस्थांचा निधी यामुळे मोफत उपचार करण्यात आले. नाशिक शहरासह ग्रामीण भागातील किशोरवयीन रुग्णांना मेंदूचा कर्करोग झाल्याचे निदान झाले. डॉ. घरोटे यांनी रुग्णांच्या आर्थिक परिस्थितीबाबत कल्पना दिल्यानंतर हॉस्पिटलच्या विश्वस्त मंडळाने आपल्यापरीने सर्वतोपरी सहकार्याची तयारी दर्शविली. मुलांचे वय लक्षात घेत कॅन्सर तज्ज्ञ डॉ. घरोटे यांनी या दोघांवर स्वतः संशोधन करत तयार केलेल्या उपचार पद्धतीचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला. यात वेदना कमी जाणवतात आणि तुलनेने खर्चही कमी लागतो. रुग्णावर बोनमॅरो प्रत्यारोपण करण्यात आले. या उपचारानंतर केलेल्या पेट स्कॅनमध्ये बालरुग्णांनी कॅन्सरवर मात केल्याचे दिसून आले. डॉ. घरोटे यांच्यासह बोन मॅरो ट्रान्सप्लांट तज्ज्ञ डॉ. सिद्धेश कलंत्री, डॉ. निलेश वासेकर व औषधोपचार तज्ज्ञ डॉ. अनुष्का देवगावकर यांच्या पथकाने ही यशस्वी कामगिरी केली.

## आ. डॉ. राहुल आहेर यांचा नागरी सत्कार




**नाशिक ।** रानवड पंचक्रोशीच्या वतीने चांदवड-देवळा विधानसभा मतदार संघाचे आमदार डॉ.राहुल आहेर यांच्या नागरी सत्काराचे आयोजन काकासाहेबनगर येथे करण्यात आले. रानवड व पंचक्रोशीतील सावरगाव, खडक माळेगाव, शिरवाडे वणी, पिंपळद, देवरगाव व दरसवाडी येथील प्रतिष्ठित नागरिक व पदाधिकारी यांनी डॉ. आहेर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. डी. के. जगताप, शिवाजी पवार, दत्ता रायते, राजेंद्र टोपे, अशोक निफाडे व मा. अजिंक्य बाळासाहेब वाघ यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी रामनाथ पानगव्हाणे, रमाकांत जाधव,संजय वाढवणे, प्रमोद वाघ, अशोक वाघ, दत्तात्रय रायते, तेजेंद्र वाघ, प्रवीण वाघ, सचिन वाघ, बाळासाहेब चव्हाण, अरुण ठोके आदी उपस्थित होते.

## 'भगवंतराव'चे ११४ व्या वर्षात पदार्पण



**नाशिक ।** मेनरोडवरील पूर्वीच्या जागेत उभारण्यात आलेल्या नवीन व प्रशस्त वास्तूमध्ये 'भगवंतराव' मिठाई व रेस्टॉरंटचा ११४ वा वर्धापन दिन सोहळा पार पडला. शहरातील सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय यासह विविध क्षेत्रातील घडामोडींचे साक्षीदार असणारे व ११३ वर्षांची शतकोत्तर परंपरा लाभलेले 'भगवंतराव' मिठाई व रेस्टॉरंट हे नागपंचमीच्या सुमुहूर्तावर नाशिककरांसाठी खुले झाले आहे. विख्यात नेमबाज व ऑलिम्पिक पदक विजेते स्वप्निल कुसळे यांची उपस्थिती या कौटुंबिक सोहळ्याचे वैशिष्ट्ये ठरले. याप्रसंगी सुहास अष्टपुत्रे, मंगला अष्टपुत्रे, अक्षय अष्टपुत्रे, कोमल अष्टपुत्रे, मिशिता, सेवानिवृत्त वरिष्ठ पोलीस अधिकारी अतुल बारोट आदी उपस्थित होते.

# लायन्स क्लब कॉर्पोरेटचा दीक्षांत समारंभ

**नाशिक । प्रतिनिधी**


लायन्स क्लब ऑफ नाशिक कॉर्पोरेटचा अकरावा दीक्षांत समारंभ झाला.

मालपाणी ग्रुपचे गिरीश मालपाणी यांच्या अध्यक्षतेखाली नवीन सभासदांना राजू व्यास यांनी शपथ दिली. प्रमुख पाहुणे म्हणून राजेश कोठावदे आणि प्रशांत कोतकर उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष म्हणून लक्ष्मीकांत पारनेरकर, सचिवपदी नितीन जाधव आणि खजिनदारपदी आर्किटेक्ट मनीष जाधव यांनी कार्यभार स्वीकारला. नवीन सात सभासदांनी शपथविधी घेतला.

पारनेरकर यांनी सर्व सभासदांकडून नेत्रदानाचा संकल्प करून घेतला. तसेच सैनिकांच्या समस्या आणि पुनर्विकासासाठी काम करणाऱ्या संस्थेस रक्कम रुपये ११हजार तसेच अवयवदान आणि नेत्रदान हे प्रत्येकाचे नैतिक कर्तव्य यावर कार्य करणाऱ्या मानवता हेल्प फाउंडेशनला रक्कम रुपये ११हजारचे योगदान दिले. नाशिकमध्ये एका शैक्षणिक संकुलास ७५ हजार रूपयांचा वॉटर फिल्टरेशन प्लांट देण्याचे जाहीर केले. विनय बिरारी यांनी सेवाकार्य म्हणून दोन महिलांना उदरनिर्वाहासाठी शिलाई मशीनचे वाटप केले. मावळते अध्यक्ष अजय सानप, सचिन शहा, उदय कोठावदे, विनय बिरारी यांनी यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अ‍ॅड. नंदकिशोर लाहोटी आणि दीपाली बिरारी यांनी केले.

## शब्दकोड : ३१४



**आडवे शब्द :** १) मकबरा. ४) गोड. ७) वयस्कर, थेरडा. १०) माफी मागणारा. ११) जन्मत. १३) लक्ष्मीचे एक नाव. १४) धोबी. १५) रंगविलेले. १६) बारा वर्षांचा काळ. १७)मिठी. १८) टपाल. १९) परवानगी. २१) हिच्या लग्नाला सतराशे विघ्न येतात. २३) शरीर. २५) मोठा जाड तट. २६) सिद्ध. २८) घाणेरड्या वस्तीत राहणे. ३१) वस्तूचे विक्री केंद्र. ३२) इंद्रिय, गात्र. ३३) युक्ती. ३५) झाडाच्या भोवतीचा कट्टा. ३७) शंकर. ३८) राजमहल. ४१) चटकन, त्वरीत. ४३) बगळा. ४४) विहीरीचा एक प्रकार. ४५) चंद्र. ४६) पादत्राण. ४७) दुर्लक्ष. ४९) कोवळा अंकूर. ५१) मागे लागले शुक्लकाष्ट. ५३) राजा. ५४) नको असलेला. ५६) गंध. ५८) गवताचे रुंद पान. ६०) अत्या (ग्रा.). ६२) लाजणारा. ६४) मौज, गंमत. ६५) ब्राह्मण. ६६) पुरुष जात. ६७) समाचार. ६९) घट्ट (कपडा). ७१) शिक्षक. ७२) निष्फळ आक्रोश. ७३) महोदय. ७४) अंगुली.

**उभे शब्द :** १) दफनभूमी. २) रक्षण करणारा. ३) फोटो ग्राफर (म.). ४) मध. ५) चित्रपटाचा पडदा. ६) प्रफुल्लित, टवटवीत. ८) तारणारा. ९) भगवान विष्णूचे सातवे रुप. १२) सूर्याचे एक नाव. २०) गीत रचणारा. २२) प्रेत २४) हिमालयातील एक केसाळ प्राणी. २५) कोळी, रेश्माचा किडा. २७) परग्रहावर जाणारे वाहन. २८) पती-पत्नी. २९) वक्र. ३०) सातू. ३१) सकाळ-संध्याकाळ मधील काळ. ३२) पुढे जाण्याची स्पर्धा. ३४) अत्यंत तलम कापड प्रकार. ३६) महाराष्ट्राचे नंदनवन. ३९) कलाभूत, सोन्याचा धागा. ४०)थापा, अफवा ४२) कृष्णा, कोयना यांच्या संगमावरील यशवंतराव चव्हाणांचे गाव. ४६) वर वधूची मिरवणूक. ४८) युद्ध, नौका (इं.) ५०) कणीदार. ५२) वाईट च्या विरुद्ध, भला. ५५) माल, वस्तू. ५७) उत्सवाचे दिवस. ५८) पारद. ५९) गणपतीचे एक नाव. ६१) नवरदेवाची आई. ६३) विष. ६५) हिस्सा, वाटा. ६८) नवरसातील दयेचा रस. ६९) भांडण. ७०) रावणाच्या मुखांची संख्या. ७२) करारातील शर्त

## शब्दकोड३१३चे उत्तर

